श्रीम सानप अर्चना विठ्ठल, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत रांजणी,ता.पाथर्डी यांचे गैरवर्तनाबाबत विभागीय चौकशी सुरु करणेकामी चौकशी अधिकारी व सादरकर्ता अधिकारी यांची नेमणूक करणेबाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर

ग्रामपंचायत विभाग

जिल्हा परिषद आदेश क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/७९८२४८३/ 29204616 /२०२६

अहिल्यानगर, दिनांक - स्वाक्षरी खाली नमूद केलेप्रमाणे

वाचा:- १.गटविकास अधिकारी पंचायत समिती पाथर्डी यांचे कडील पत्र क्र.आस्था-२/७१७/२०२५ दिनांक १६/१०/२०२५.

२.इकडील दोषारोप/ज्ञापन क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/२५६/२०२५/१९३७२६१,दि.२६.११.२०२५.

३.गटविकास अधिकारी पंचायत समिती,पाथर्डी यांचेकडील पत्र क्र.आस्था-२/८०१/२०२५ दि.०५/१२/२०२५. (ज्ञापन पोहोच)

४.गटविकास अधिकारी पंचायत समिती,पाथर्डी यांचेकडील पत्र क्र.आस्था-२/८१७/२०२५ दि.१७/१२/२०२५ नुसार श्रीम सानप ए.व्ही.,ग्रामपंचायत अधिकारी,ग्रामपंचायत रांजणी, ता.पाथर्डी यांचा खुलासा दिनांक ११/१२/२०२५.

५.महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) १९६४ मधील नियम ६ मधील (३) (५)

ज्याअर्थी, श्रीम.सानप अर्चना विठ्ठल, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत रांजणी ता.पाथर्डी येथे कार्यरत असताना गैरवर्तन केल्याने त्यांचे विरुध्द संदर्भ क्र.२ अन्वये एकुण ०१ ते १२ दोषारोप ठेवण्यात आले होते. श्रीम सानप, यांनी संदर्भ क्र.४ नुसार दोषारोपांचा खुलासा सादर केलेला असुन त्यांचेवर ठेवण्यात आलेले आरोप क्र.०१ ते १२ अमान्य केलेले आहेत. सबब, श्रीम सानप, यांचे विरुध्द न्याय हक्काचे दृष्टीने चौकशी करणे आवश्यक असलेने महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ६ च्या तरतुदींनुसार चौकशी करणे आवश्यक असलेने संदर्भ क्र.२ चे ज्ञापनमध्ये नमुद केल्यानुसार चौकशी करणे कामी चौकशी अधिकारी व सादरकर्ता अधिकारी यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

त्याअर्थी मी, मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद अहिल्यानगर, उक्त नियमाच्या तरतुदींनुसार व मला प्रदान करणेत आलेल्या शक्तींचा वापर करुन श्रीम.सानप अर्चना विठ्ठल, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत रांजणी ता.पाथर्डी यांचेवर ठेवण्यात आलेल्या दोषारोपाच्या संदर्भात चौकशी करण्याचे आदेश देत आहे. सदरची चौकशी करणेकामी चौकशी अधिकारी म्हणून सहा.आयुक्त (चौकशी), नाशिक विभाग, नाशिक यांची व सादरकर्ता अधिकारी म्हणून जिल्हा परिषद अहिल्यानगर यांचेवतीने

श्री.रानमळ दत्तात्रय ओंकार, विस्तार अधिकारी, (पंचायत) पंचायत समिती पाथर्डी यांची नियुक्ती करीत आहे.

नियुक्त सादरकर्ता अधिकारी यांनी प्रत्येक चौकशीच्या तारखेस हजर रहावे. त्याचप्रमाणे श्रीम अर्चना विठठल सानप, यांचे विरुध्द ठेवण्यात आलेल्या दोषारोपांचे आक्षेप व पुरावे यांचा सखोल अभ्यास करुन जिल्हा परिषदेची सक्षम प्रकारे बाजू मांडावी. विभागीय चौकशी वेळेत पुर्ण करणे कामी आवश्यक ते सर्वकामकाज नियमाप्रमाणे करावे व होणा-या प्रत्येक सुनावणीस नियुक्त सादरकर्ता अधिकारी यांनी उपस्थित रहावे.

विभागीय चौकशी प्रकरणी चे कामकाजात टाळाटाळ करण्याचे गैरवर्तन केल्याचे निदर्शनास आल्यास सादरकर्ता अधिकारी यांना जबाबदार धरण्यात येईल, याची नोंद घ्यावी. या खाते निहाय विभागीय चौकशीस महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ च्या नियमांतील तरतुदी लागू राहतील.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०१२२०६०००७ असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 22-01-2026 15:36:06
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

१. विभागीय चौकशी अधिकारी तथा सहा.आयुक्त, (चौकशी)
विभागीय आयुक्त कार्यालय,नाशिक विभाग, नाशिक.

२/- सोबत श्रीम.सानप अर्चना विठ्ठल, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत रांजणी ता.पाथर्डी यांचे गैरवर्तनाबाबतचे पत्रव्यवहार संचिका या समवेत जोडली आहे. तरी चौकशी करुन अहवाल इकडेस सादर करावा.

२. श्री.रानमळ दत्तात्रय ओंकार, विस्तार अधिकारी,(पंचायत) पंचायत समिती पाथर्डी.
व्दारा व प्रत:- गटविकास अधिकारी, पंचायत समिती पाथर्डी.

३. गटविकास अधिकारी, पंचायत समिती पाथर्डी.

२/- सोबतचा आदेश श्रीम सानप अर्चना विठठल,ग्रामपंचायत अधिकारी यांना बजावून तो मिळालेबाबत दुय्यम प्रतीवर त्यांची तारखेसह स्वाक्षरी घेऊन पोहोच या कार्यालयास सादर करावी.

४. निवड नस्ती.